# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः11.07.2026 वारःशनिवार

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन यांच्यात शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा; दोन्ही देशांत विविध क्षेत्रात सामंजस्य करार
2. 'महेंद्रगिरी' ही स्वदेशी बनावटीची सहावी युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात आज समाविष्ट होणार
3. देशाच्या किनारपट्टीवरील सुरक्षा अभेद्य करण्यासाठी सरकार कटिबद्ध – केंद्रीय मंत्री अमित शहा आणि
4. महाराष्ट्र राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन संस्थगित; आगामी हिवाळी अधिवेशन सात डिसेंबर रोजी- नागपुरात

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या तीन देशांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात काल न्यूझीलंड इथे पोहोचले. भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज संरक्षण, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय; पर्यटन, क्रीडा आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांशी संबंधित पाच महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. यातून दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे. ऑकलंडमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सन यांच्यात शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा झाल्यानंतर- या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. द्विपक्षीय चर्चेपूर्वी 'गव्हर्नमेंट हाऊस' इथे मोदी यांचं औपचारिक स्वागत करण्यात आलं; त्यावेळी त्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' देण्यात आला.

आपली न्यूझीलंड भेट ही द्विपक्षीय संबंधांमधील एक ऐतिहासिक टप्पा असून यामुळे दोन्ही देशांमधील संबंधांना नवी गती मिळेल असं पंतप्रधान मोदी म्हणाले. 'धोरणात्मक भागीदारी' प्रस्थापित करून दोन्ही देशांनी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचललं असून, भविष्यातील सहकार्यासाठी हे दिशादर्शक ठरणार आहे, असं त्यांनी सांगितलं. दोन्ही देशांमधील सामायिक लोकशाही मूल्ये आणि सागरी संबंधांवर त्यांनी प्रकाश टाकला. भारत आणि न्यूझीलंड 'इंडो-पॅसिफिक' क्षेत्रात शांतता, स्थिरता आणि सुरक्षा बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात असं त्यांनी सांगितलं. भारतीय पंतप्रधान- 40 वर्षांनंतर प्रथमच न्यूझीलंडला भेट देत आहेत, पंतप्रधान मोदी यांची ही भेट 'एक ऐतिहासिक टप्पा' असल्याचं न्यूझीलंडच्या पंतप्रधानांनी म्हटलं आहे. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी प्रमुख व्यावसायिक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांशी संवाद साधणार आहेत, तसंच भारतीय समुदायालाही ते संबोधित करतील.

**नौदल**

भारतीय नौदलाच्या 'प्रोजेक्ट 177-ए' अंतर्गत 'महेंद्रगिरी' F38 ही स्वदेशी बनावटीची सहावी युद्धनौका, नौदलाच्या ताफ्यात आज समाविष्ट केली जाणार आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत हा समारंभ होईल. संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता आणि स्वदेशी युद्धनौका बांधणीच्या दिशेने भारताच्या वाटचालीतील हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. या समारंभाच्या पूर्वसंध्येला संरक्षण मंत्र्यांनी विशाखापट्टणम इथे काल नौदल कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. हिंदी महासागर क्षेत्रात शांतता आणि स्थैर्याचा प्रमुख आधारस्तंभ म्हणून -भारताची भूमिका त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केली.

**अमित शहा**

देशाच्या किनारपट्टीवरील सुरक्षा अभेद्य करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्यासमवेत त्यांनी काल बंदर सुरक्षा विभाग BoPS च्या प्रगतीचा आढावा घेतला. बंदरांच्या सुरक्षेची जबाबदारी केवळ परवानाधारक खाजगी सुरक्षा संस्थांवरच सोपवावी तसंच, तिथे केवळ केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल - CISF द्वारे प्रशिक्षित कर्मचाऱ्यांनाच, तैनात केलं जावं, असं शहा म्हणाले. उपलब्ध पायाभूत सुविधांचा वापर करून बंदर सुरक्षा प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षण लवकरात लवकर सुरू करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत मासेमारी बंदरे आणि मासे उतरवण्याच्या केंद्रांच्या सुरक्षा व्यवस्थेचाही शहा यांनी आढावा घेतला. इस्रो द्वारे विकसित 'नभमित्र' ॲपचा

व्यापक प्रसार करण्याचे निर्देश त्यांनी दिले. मच्छिमारांच्या नोंदणीची प्रक्रिया सुलभ करण्यात यावी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांनी मासे उतरवण्याच्या केंद्रांवर कायमस्वरूपी पोलीस कर्मचारी तैनात करून पुरेशी सुरक्षा निश्चित करावी असे निर्देशही शहा यांनी दिले.

**रेल्वे**

भारतीय रेल्वेने सुरक्षा आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी उत्तर रेल्वेच्या 680 किलोमीटर मार्गावर 'कवच' प्रणाली तैनात करण्यासाठी 206 कोटी रुपयांना मंजुरी दिली आहे. जास्त वर्दळीच्या आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या मार्गांवर स्वदेशी सुरक्षा प्रणालीचा विस्तार करणे, हे या प्रकल्पाचं उद्दिष्ट आहे. 'कवच 4.' ची तरतूद दिल्ली विभागातील रेवाडी-दिल्ली आणि शकूरबस्ती-बठिंडा या मार्गांवर लागू केली जाईल. रेल्वे अपघात रोखण्यासाठी ही प्रणाली तयार करण्यात आल्याचं रेल्वे मंत्रालयाने म्हटलं आहे.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. जयशंकर यांनी काल मस्कत इथे ओमानचे परराष्ट्र मंत्री बद्र बिन हमद अल बुसैदी यांची भेट घेतली आणि दोन्ही देशांमधील सहकार्याच्या विविध पैलूंवर चर्चा केली. या चर्चेत व्यापार, गुंतवणूक, दळणवळण; सागरी क्षेत्र, तंत्रज्ञान, संरक्षण तसंच सायबर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांवर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करण्यात आलं. आखाती प्रदेशातील घडामोडी आणि या भागात शांतता, स्थिरता राखण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांबाबतही दोन्ही नेत्यांनी विचारविनिमय केला. भारत आणि ओमान यांच्यातील धोरणात्मक भागीदारीचा विश्वास आणि सामर्थ्य या चर्चेतून दिसून आल्याचं डॉ. जयशंकर यांनी अधोरेखित केलं. जयशंकर यांनी काल ओमानमधील भारतीय समुदायाशीही संवाद साधला. भारत-ओमान संबंध अधिक दृढ करण्याबाबत तिथल्या भारतीयांमध्ये असलेला उत्साह स्पष्ट दिसून येत असल्याचं डॉ. जयशंकर यांनी म्हटलं आहे.

**औषधे**

उच्च प्रमाणात अल्कोहोल असलेल्या औषधांचं नियमन अधिक कडक करण्यासाठी केंद्र सरकारने 'औषध नियमन, 1945' मध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार आता 30 मिली लीटरपेक्षा जास्त मापानं विकल्या जाणाऱ्या कोणत्याही औषधात 12 टक्क्यापेक्षा जास्त एथाईल अल्कोहोल असेल तर डॉक्टरांच्या चिठ्ठीविना ते खरेदी करता येणार नाही. अशा उत्पादनांसाठी आवश्यक परवाने घेणे बंधनकारक असणार आहे. अल्कोहोलयुक्त औषधांचा गैरवापर रोखण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारने नियमात सुधारणा केल्या आहेत.

**उपराष्ट्रपती-बिहार**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आज बिहारमधील गया इथे एक दिवसाच्या दौऱ्यावर असतील. या दौऱ्यादरम्यान, गया इथल्या 'बिहार इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन अँड रुरल डेव्हलपमेंट' इथे बिहार विधानसभेच्या सदस्यांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राला उपराष्ट्रपती संबोधित करतील.

**मेघवाल**

संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल आणि डॉ. एल. मुरुगन यांनी काल आगामी पावसाळी अधिवेशनाच्या तयारीचा आढावा घेतला. संसदेचं हे अधिवेशन 20 जुलैला पासून 13 ऑगस्टपर्यंत चालणार आहे.

**विधिमंडळ**

महाराष्ट्र राज्याचं विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन काल संस्थगित करण्यात आलं. या अधिवेशनात विविध 21 विधेयकांना मंजुरी देण्यात आली. विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन यंदा सात डिसेंबर रोजी नागपुरात घेणार असल्याचं विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी यावेळी सांगितलं. तत्पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर दिलं. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातप्रकरणी सीआयडी आणि एएआयबी या दोन संस्थांकडून तपास सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. विमानाच्या सर्व यंत्रणा तपासल्या असून अंतिम अहवाल पुढच्या वर्षी जानेवारीत येणं अपेक्षित आहे. तो मिळाल्यानंतरच पुढच्या तपासाची दिशा ठरवता येईल असं मुख्यमंत्री म्हणाले.

**अयोध्या**

अयोध्येतील राम मंदिरासाठीच्या देणग्यांच्या कथित अपहाराची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय सोमवारी सुनावणी करणार आहे. राम मंदिरातील देणग्यांच्या कथित अपहार प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आठही आरोपींना न्यायालयानं 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

**व्हेनेझुएला भूकंप**

व्हेनेझुएलामध्ये झालेल्या दोन भूकंपांमधील मृतांचा आकडा चार हजारांच्या वर गेला आहे. 24 जून रोजी तिथे 7.2 आणि 7.5 तीव्रतेचे लागोपाठ दोन भूकंप झाले. या भूकंपांमुळे 'ला गुएरा' (La Guaira) या किनारपट्टीवरील राज्यातील सर्व जिल्हे उद्ध्वस्त झाले असून, 4 हजार 118 लोकांचा मृत्यू झाला आणि 16 हजार 740 जण जखमी झाल्याची माहिती व्हेनेझुएलाच्या संसदेचे प्रमुख जॉर्ज रॉड्रिग्ज यांनी दिली. हजारो लोक अजूनही बेपत्ता आहेत.

**फिफा-विश्वचषक**

फिफा विश्वचषक फुटबॉल मध्ये अमेरिकेतील इंग्लवुड इथे काल रात्री झालेल्या दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात स्पेननं बेल्जियमचा 2-1 असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. याआधी, पहिल्या उपांत्यपूर्व सामन्यात फ्रान्सनं मोरोक्कोचा 2-0 असा पराभव केला होता.

**टेनिस**

विम्बल्डन टेनिसमध्ये, आज लंडन इथे महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात चेक प्रजासत्ताकची कॅरोलिना मुचोव्हा आणि तिचीच सहकारी लिंडा नोस्कोव्हा आमनेसामने असतील.

# या बरोबरच हे राष्ट्रीत बातमीपत्र संपलं, नमस्कार.